# सीप्झ ते बीकेसी मेट्रो सप्टेंबरमध्ये सुरू होणार

## प्रकल्पाची किंमत गेली ३७ हजार कोटींवर

मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी) – विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारला प्रकल्पांच्या उद्घाटनाची घाई लागली आहे. त्यामुळे सीप्झ ते बीकेसी हा मेट्रो रेल्वेचा पहिला टप्पा सप्टेंबर महिन्यापर्यंत सुरू करण्याची योजना राज्य सरकारने आखली आहे.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला आयोजित करण्यात आलेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सरकारच्या हिश्श्याची रक्कम थेट मुंबई मेट्रो रेल्वेला देण्यास आज मान्यता देण्यात आली. पुढील तीन–चार महिन्यांत विधानसभेची निवडणूक होत आहे. या निवडणुकीपूर्वी सरकारला प्रकल्पांच्या उद्घाटनाची घाई लागली आहे. या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

*मुंबई मेट्रो रेल्वे टप्पा–३ लवकर सुरू करण्याच्या दृष्टीने राज्य सरकारच्या हिश्श्याची १ हजार १६३ कोटी एवढी रक्कम एमएमआरडीएला देण्याऐवजी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला देण्यास मान्यता देण्यात आली. या प्रकल्पाची सुधारित किंमत ३७ हजार २७५ कोटी ५० लाख असून प्रकल्पाचे काम ९८ टक्के पूर्ण झाले आहे. बीकेसी ते कुलाबा टप्पा डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करण्याची योजना आहे.*